१०..............नियमीत दिवाणी दावा २१३/२०१२
**सुर्यकांत..विरुध्द प्रकाश.**
**नि.क. ४१ खाली**

**वादीचा साक्षीदार सुर्यकांत हरीभाउ ढगे,**

**साक्षीदाराचा उर्वरित उलट तपास प्रतिवादी क. १ व २ तर्फे श्री. जी.आर. हुंगे यांच्या मार्फतः**

आता मला मी दाखल केलेला मौजा रानमांगली गट नं. ५३ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. सदर ७/१२ उता-याची प्रत प्रमाणति आहे. त्यास **निशाणी क.८०** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००१ ते २००४ या कालावधीमध्ये दावा मिळकत माझ्या कब्जयात असल्याचे सदर ७/१२ उता-यावर नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०००पुर्वी दावा मिळकतीवर माझा कब्जा असल्याबाबतचे कागदपत्र उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ नंतर दावा मिळकतीवर माझा कब्जा दाखविणारे दस्त अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवर माझा कब्जा नसल्यामुळे त्या संबंधी कुठलाही दस्त माझ्याकडे उपलब्ध नाही.

मी २४ वर्षांचा असताना प्रतिवादी क. १ तसेच माझे आईवडील व दोन बहीणी यांनी माझ्या नावे बक्षीस पत्र लिहुन दिले. सदर बक्षीसपत्र हे सन १९७२ नंतर करण्यात आले होते. बक्षीसपत्र करतेवेळी माझ्या कुटुंबियाव्यतिरिक्त घरामालक श्री. बोकडे हजर होते. त्याव्यतिरिक्त इतर कोणीही हजर नव्हते.

**प्रश्न :** बक्षीस पत्राचा स्टॅम्प कोणी आणला होता?

**उत्तर** : त्यावेळी स्टॅम्पची गरज नव्हती.

माझ्या वडीलांकडे कोरकागद होते. त्यावर त्यांनी बक्षीस पत्र लिहुन दिले. सदर बक्षीसपत्राची नोंदणी केली नाही. बक्षीस पत्रावर माझ्या वडीलांचे हस्ताक्षर व हजर सर्वांच्या सहया होत्या. सदर बक्षीस पत्रावर साक्षीदार म्हणुन कोणाचीही सही नाही. सदर बक्षीसपत्र मी अभिलेखावर दाखल करु शकत नाही. सदर बक्षीसपत्र करुन दिल्यावर त्यामधील जमीन माझ्या नावावर व्हावी याकरिता महसुल खात्याकडे अर्ज केला नव्हता.

माझे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले आहे. सन १९७२ साली माझे १० वी चे शिक्षण पुर्ण झाले होते. सन १९८० साली मी ग्रज्युयेट झालो. मी कालांतराने शिक्षण घेतल्याचा उल्लेख मला दाव्यात करणे मला आवश्यक वाटले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी ठेकेदारचे काम देखील करतो. मी सन २००२ ते २०११ पर्यंत ठेकेदारीचे काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत हरीभाउला मिळाल्यावर त्यांनी वहीवाटी खाली आणली. हरीभाउने शेतामध्ये कधीही पिक घेतले नाही. शेतात कुठलेच पिक घेतले जात नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील नोकरी करत होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांना सेवानिवृत्तीनंतर पेंशन मिळत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे आईवडील त्यांचा संपूर्ण उदरनिर्वाह पेंशनमधुन करत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी पेंशनच्या माध्यमातुन प्रतिवादी क्र. १ याला शिकवीले होते. मी वडीलांच्या निधनापर्यंत त्यांच्यासोबतच राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की मी व माझे कुटुंब नागपूरला राहतो. हे म्हणणे खरे आहे की,माझे वडील उमरेडला राहत होते.

प्रश्न : प्रकाश व त्याचे कुटुंब तुमच्या वडीलांसोबत राहत होते?

उत्तर : काही दिवस राहत होते.

प्रकाश व त्याचे कुटुंब सन १९८३ पर्यंत वडीलांसोबत राहत होते. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी प्रकाश व त्याची पत्नी दोघेही नोकरी करित होते. सन १९८३ मध्ये प्रकाशने स्वत:चे घर उमरेड येथे बांधले व तो तेथे राहण्यास गेला. प्रकाशचे लग्न कुठल्यासाली झाले हे मला आठवत नाही. मी प्रकाशच्या लग्नाला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की प्रकाश त्याच्या स्वत:च्या घरात राहायला गेला त्यावेळी आमचे वडील देखील त्याच्या घरात राहायला गेले होते.

**वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

वा.दा.ब.अ.क.केले
न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड

समक्ष,
(जा.म. मिस्त्री)
प्रभारी २रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड
.दि : १२/०४/२०२२.

१२......... नियमीत दिवाणी दावा २१३/२०१२

सुर्यकांत..विरुध्द प्रकाश.

नि.क. ४१ खाली

**साक्षीदाराचा उर्वरित उलट तपास प्रतिवादी क. १ व २ तर्फे श्री. जी.आर. हुंगे यांच्या मार्फत:**

माझे लग्न सन १९८१ साली झाले आहे. लग्नानंतर मी चंदननगर, नागपूर व उमरेड दोन्हीकडे राहत होतो. नागपूरला राहत असताना माझ्या सोबत पत्नी, दोन मुलं व माझे आईवडील असे एकत्र राहत होता. माझे आईवडील २० वर्षे माझे सोबत राहीले. २० वर्षांनतर माझे वडील उमरेडला राहायला गेले. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी प्रकाश व त्याचे कुटुंब वडीलांसोबत राहत होते. हे म्हणण खरे आहे की प्रकाश त्याच्या लग्नानंतरही आईवडीलांसोबत राहत होता.

दावा मिळकतीत असलेल्या झोपडीचा उल्लेख मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर केला आहे. आता मला दाखविण्यात आलेल्या नि.क्र. ८० वर झोपडीचा उल्लेख नाही तसेच, टेलिफोन घेतल्याची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की विजेची नोंद ७/१२ उताऱ्यावर असते. नि.क्र. ८० वरील ७/१२ उताऱ्यावर विजेची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, झोपडी व विजेची ७/१२ उताऱ्यावर नोंद केली नाही. झोपडी व विजेची नोंद सरकारी नियमाप्रमाणे ७/१२ उताऱ्यावर होत नाही म्हणुन मी तशी केली नाही. तसेच ७/१२ उताऱ्यावर झोपडी व विजेची नोंद करण्याकरिता मी अर्ज केला नव्हता. मी शेतामध्ये नोकर ठेवला होता त्याला किती पगार देत होतो यासंबंधी कागदपत्र मी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी नोकर ठेवला नसल्यामुळे त्याच्या पगारासंबंधी कागदपत्र दाखल केले नाही.

सरोज माझी मोठी बहीण तर शालू ही माझी लहान बहीण आहे. मोठया बहीणीचे लग्न कोणत्यावर्षी झाले हे माझे लक्षात नाही. लहान बहीणीचे लग्न सन १९७४-१९७५ साली झाले. हे म्हणणे खरे नाही की,माझे वडील प्रकाशकडे राहत होते व त्याच्याकडेच त्यांचा मृत्यु झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी त्यांचा शेवटचा श्वास प्रकाशकडे

असताना सोडला. माझ्या वडीलांनी त्यांचा शेवटचा श्वास माझ्या कडे मंगळवारीपेठ उमरेड येथे सोडला होता.

मी अंदाजे सन १९७८ साली कोळश्याचा धंदा सुरु केला. चुन्याची फॅक्टरी सन १९८० -१९८१ साली सूरु केली. मी आयकर भरतो. मी सन १९८१ पासून आयकर भरत आहे. हे म्हणणे खरे आहे की आयकर भरत असताना त्यामध्ये मी माझे उत्पन्न व खर्चाच्या बाबी नमुद करत होतो. माझे शपथपत्राच्या परिच्छेद क्र. ७ मध्ये उल्लेख केलेल्या खर्चाच्या बाबी मी आयकर भरताना नमुद केल्या होत्या. त्यासंबंधी कागदपत्र मी अनेकवर्ष झाल्यामुळे मी दाखल करु शकत नाही.

प्रश्न :आयकर विभागाकडे अर्ज तुम्ही कागदपत्रे मागवू शकता?

उत्तर : कोर्टालाच मागवू दया.

सन २००८ ते २०१० या दरम्यान दावा मिळकतीचे मोजमाप करण्यात आले होते. सदर मोजमाप करतेवेळी मी हजर होतो. मोजमापावेळी माझा भाउ प्रकाश याने माझ्या माणसाला शिवीगाळ केली होती. माझ्या माणसाचे नाव राजू नारायण वल्के आहे. राजू वल्के याने प्रकाश विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही. प्रकाशने राजुला शिवीगाळ न केल्यामुळे राजूने तशी तक्रार दिली नाही, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की,माझे वडील जिवंत असेपर्यंत दावा मिळकत शेत जमीनीचे मालक तेच होते. सदर शेतजमीनीचे माझे वडीलांनी सर्वांच्या समंतिने माझे नावाने बक्षीसपत्र करुन दिले होते. सदर बक्षीसपत्र अंदाजे १९७६मध्ये करुन दिले होते. सदर बक्षीसपत्र कागदावर केले होते. त्यावेळी माझे आईवडील,दोन बहीणी, मी व लहान भाउ प्रकाश हजर होतो. सदर बक्षीसपत्र प्रकाश याच्या ताब्यात असल्यामुळे ते मी दाखल करु शकत नाही.

मी प्रतिवादी क्र. १ व २ यांना नोटीस कधी पाठविली होती हे माझ्या लक्षात नाही. प्रतिवादी माझ्या शेतामध्ये लुडबुड करत होते त्यामुळे मी

त्यांना नोटीस पाठविली होती. त्यासंबंधी प्रस्तुत खटला दाखल करण्यात आला आहे. मी या शेतीचा दावा भिवापूर न्यायालयात दाखल केला आहे. त्याचा नियमीत दिवाणी दावा क्र. १२९/२००८ व नियमीत दिवाणी दावा क्र. ४३/२०१८ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की नियमीत दिवाणी दावा क्र. १२९/२००८मधील तात्पूरता मनाई हुकुम नि.क्र. ५ न्यायालयाने नामंजूर केला होता. हे म्हणणे खरे आहे की नियमीत दिवाणी दावा क्र. ४३/२०१८मधील माझा स्टेसकोचा अर्ज नामंजूर करण्यात आला होता.

**वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

वा.दा.ब.अ.क.केले

समक्ष,

(जा.म. मिस्त्री)
प्रभारी २रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड.
दि : २८/०४/२०२२.

न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड